# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक** 2 **डिसेंबर,** 2018 रोजी घेण्यात आलेल्या "**महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा - 2018**" च्या **कर सहायक पदाचा** पेपर क्रमांक-2 (**स्वतंत्र पेपर**) या प्रश्नपत्रिकेच्या चारही संचाची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

सदर परीक्षेमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| **संच A** | **संच B** | **संच C** | **संच D** |
|---|---|---|---|
| 38 | 35 | 35 | 31 |
| 44 | 42 | 45 | 41 |
| 48 | 44 | 46 | 48 |

**प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांना प्रश्नपत्रिकेच्या उत्तरतालिकेतील प्रश्न - उत्तरासंबंधी हरकती/अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती परीक्षा नियंत्रक व सहसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$, 7 व 8 वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई 400021 या पत्त्यावर पाठवावे. या संदर्भात **दिनांक 13 डिसेंबर,** 2018 पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या अभिवेदनांचीच / हरकतींचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेल्या हरकती /अभिवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : 6 डिसेंबर, 2018
ठिकाण : मुंबई

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई